दिनांक ०३/०१/२०२२

# प्रेस नोट

**आरोपी लोकसेवक शेषेराव शिवराम टिपरसे, वय ५७ वर्षे, पद नायब तहसिलदार (महसुल), वर्ग २, नेमणुक तहसील कार्यालय, चाकुर ता. चाकुर जि. लातूर यांनी लाचेची मागणी करून लाच स्विकारली म्हणुन गुन्हा दाखल.**

यातील तक्रारदार यांना त्यांची आई व बहीण यांच्या मध्ये जमिनीचा व्यवहार झाला असुन सदर जमिनीवरून तक्रारदार व त्यांचे वडील यांनी यापुर्वी बॅकेचे कर्ज घेतलेले असुन सदर जमिनीवर बँकेचा बोजा असल्यामुळे सदर जमिनीच्या फेरफारास बॅके मार्फत लेखी अर्ज करून आक्षेप नोंदविण्यात आला होता. सदर आक्षेप अर्जाच्या अनुषंगाने तक्रारदाराच्या बाजुने निकाल देवुन जमिनीच्या व्यवहारात मदत करण्यासाठी तक्रारदारास १५,०००/—रुपये लाचेची मागणी केली बाबतची तक्रार दिनांक २७/१२/२०२१ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातुर यांच्या कडे प्राप्त झाली होती.

तक्रारदार यांचे तक्रारीच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर यांच्या कडून दिनांक ०३/०१/२०२२ रोजी लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता, तक्रारदार यांना त्यांची आई व बहीण यांच्या मध्ये जमिनीचा व्यवहार झाला असुन सदर जमिनीवरून तक्रारदार व त्यांचे वडील यांनी यापुर्वी बँकेचे कर्ज घेतलेले असुन सदर जमिनीवर बँकेचा बोजा असल्यामुळे सदर जमिनीच्या फेरफारास बँके मार्फत लेखी अर्ज करून आक्षेप नोंदविण्यात आला होता. सदर आक्षेप अर्जाच्या अनुषंगाने तक्रारदाराच्या बाजुने निकाल देवुन जमिनीच्या व्यवहारात मदत करण्यासाठी तक्रारदारास १५,०००/—रुपये लाचेची मागणी केल्याचे लाच पडताळणी दरम्यान निष्पन्न झाले.

तक्रारदार हे दिनांक ०३/०१/२०२२ रोजी सदर लाचेची रक्कम १५,०००/—रुपये देण्याकरीता आरोपी लोकसेवक शेषेराव शिवराम टिपरसे यांच्याकडे तहसील कार्यालय, चाकुर येथे गेले असता आरोपी लोकसेवक शेषेराव शिवराम टिपरसे यांनी १५,०००/— रूपये लाचेची रक्कम पंचासमक्ष स्वत: स्विकारली.

म्हणून तक्रारदार यांचे फिर्यादीवरून आरोपी लोकसेवक यांच्या विरुध्द पोलीस स्टेशन चाकुर, ता. चाकुर, जि. लातुर येथे कलम ७ ला.प्र.का. अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात येत आहे.

गुन्हाचा तपास पोलीस उपअधीक्षक पंडीत रेजितवाड, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर हे करीत आहेत.

सदरची सापळा कार्यवाही डॉ. राहुल खाडे, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद परिक्षेत्र, औरंगाबाद, अतिरीक्त कार्यभार पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड. धरमसिंग चव्हाण, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधीक्षक पंडीत रेजितवाड, सपोउपनि संजय पस्तापुरे, पोह/रमाकांत चाटे, फारूख दामटे, भागवत कटारे, पोना/संतोष गिरी, मपोना/शिवकांता शेळके, पोका/ शिवशंकर कच्छवे, अमर वाधमारे, संदीप जाधव, दिपक कलवले, मंगेश कोंडारे, गजानन जाधव, मपोशि रुपाली भोसले, चापोना/राजु महाजन यांनी पार पाडली आहे.

तरी सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी हे शासकीय काम करण्यासाठी लाचेची मागणी करीत असल्यास तसेच त्यांचे लाचेच्या मागणी संदर्भात खालील क्रमांकावर संपर्क करावा.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | धरमसिंग चव्हाण, अपर पोलीस अधीक्षक | :— | मोबाईल क्रमांक ९९२३४१७०७६ |
| २) | पंडीत रेजितवाड, पोलीस उप अधीक्षक | :— | मोबाईल क्रमांक ९३०९३४८१८४ |
| ३) | टोल फ्री हेल्पलाईन क्रमांक | :— | १०६४ |
| ४) | कार्यालयाचा फोन क्रमांक | :— | ०२४८२—२४२६७४ |
| ५) | Website | :— | www.acbmaharashtra.gov.in |
| ६) | Mobile App | :— | www.acbmaharashtra.net |
| ७) | Facebook Page | :— | www.facebook.com/MaharashtraACB |

पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर

Scanned with CamScanner